पान १ वरून

## भटक्या विमुक्तांचा समावेश अनुसुचित जमातींमध्ये (एस. टी) झालाच पाहिजे : पद्मश्री लक्ष्मण माने

उपस्तित केला. हैद्राबाद गॅझेटप्रमाणे व सातारा गॅझेटप्रमाणे या सर्व ४२ जमाती आदिवासी ठरतात. हैद्राबादमध्ये, निजामसंस्थानामध्ये आजही या जमाती अनुसुचित जाती व जमातीमध्ये आहेत. शेजारच्या कर्नाटकामध्ये भटक्या विमुक्त जमाती अनुसुचित जातीत आहेत. तेलंगणा हैद्राबादमध्ये ते अनुसुचित जमातीमध्ये आहेत. मध्यप्रदेशमध्ये त्या अनुसुचित जातीत आहेत. कैकाडी आणि पारधी या दोन जमाती विदर्भामध्ये अनुसुचित जाती आणि जमातीमध्ये आहेत. तर उरलेल्या महाराष्ट्रामध्ये त्या गुन्हेगार जमातीमध्ये आहेत.


एकाच राज्यामध्ये ही परवड चालू आहे. तेव्हा आम्ही अशी मागणी करत आहोत आमचा समावेश अनुसुचित जमातीमध्ये झाला पाहिजे. सरकारने आमच्यासाठी काहीच करायचे नाही. ५.५० टक्के जागा या आमच्या संवर्गाला मिळालेल्या आहेत. तेव्हा नव्याने काही दयायचे नाही. कोणाचे काढून दयायचे नाही किंवा कुठल्यातरी यादीत घालायचे नाही तर फक्त यांना आदिवासींचे स्टेटस दयायचे आहे. आणि भारतीय राज्यघटनेचे संरक्षण दयायचे आहे ही आतिशय न्यायाची मागणी आहे. कोणावरही अन्याय करणारी नाही. जेवढी आमची मागणी आहे तेवढेच दया. हे घेतल्याशिवाय आम्ही थांबणार नाही, असे माने यांनी सांगितले.

## भुजबळांना मी आश्वस्त केलंय; अखेर मुख्यमंत्री फडणवीसांची स्पष्टोक्ती

पसरवत आहेत. मात्र आमचं ब्रीद वाक्य आहे 'सिंहासन चढते जाना, सब समाज को साथ में लेकर आगे बढ़ते जाना', असे सांगत त्यांनी दोन्ही समाजांमध्ये ऐक्य ठेवण्याचा संदेश दिला.

फडणवीस यांनी स्पष्ट केलं की, मराठा समाज हा महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलणारा समाज आहे. त्यांचं कल्याण आवश्यक आहेच, पण त्याचवेळी इतर कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही, याचीही आम्ही काळजी घेत आहोत. या निर्णयावरून राज्यात राजकीय हालचालींना वेग आला असून, एकीकडे मराठा समाजात समाधान व्यक्त होत असतानाच, दुसरीकडे ओबीसी समाजातील काही गट नाराजी व्यक्त करत आहेत. मात्र, काही ओबीसी संघटनांनी या जीआरचे स्वागतही केल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

## आपत्ती काळात तत्पर सेवा देण्यासाठी अग्निशामक जवानांना कोलाड येथे प्रशिक्षण



पोहण्याचे कौशल्य, जीवनरक्षक जॅकेटशिवाय पोहणे, तसेच वाहत्या पाण्यातून बोटींवर सुरक्षितपणे चढणे याचा सराव घेण्यात आला. याशिवाय कोणत्याही आपत्कालीन प्रसंगी त्वरित प्रतिसाद कसा द्यावा, हेही शिकवण्यात आले. रेस्क्यू टेक्निक्स (Rescue Techniques) आणि विविध पद्धतींचा सराव करून जवानांना कठीण परिस्थितीत प्रभावी बचावकार्य कसे करावे हे शिकवले गेले.

फक्त रेस्क्यूच नाही, तर बचावानंतरचे प्राथमिक उपचारही तितकेच महत्त्वाचे असतात. म्हणूनच फर्स्ट एड साहित्य उपलब्ध नसल्यास आजूबाजूच्या वस्तूंचा वापर करून मदत कशी करावी, पाण्यात फिट आल्यास कोणते उपाय करावेत, तसेच पाण्यात बुडालेल्या व्यक्तीला वाचवताना कोणत्या बाबींची काळजी घ्यावी, हे जवानांना शिकवण्यात आले. 'गोल्डन अवर'चे महत्त्व, त्या काळात जीव वाचवण्यासाठी आवश्यक उपाययोजना याविषयी प्रत्यक्ष माहिती देण्यात आली. यासोबतच ब्रेन स्ट्रोक किंवा हार्ट अटॅकसारख्या वैद्यकीय आपत्कालीन स्थितीत योग्य पद्धतीने कसा उपचार करता येऊ शकतो, याबाबतही प्रशिक्षण दिले गेले.

या प्रशिक्षणात सीपीआर (CPR) टेक्निक्स, आर्टिफिशियल रेस्पिरेशन (Artificial Respiration) देण्याच्या तंत्राचा सखोल अभ्यास करून घेण्यात आला. लहान मुलं, वयोवृद्ध किंवा प्रौढ व्यक्तींना सीपीआर देण्याच्या पद्धती कशा वेगळ्या असतात, याची माहिती दिली गेली. तसेच सर्पदंश झाल्यावर काय करावे, जखमी व्यक्तीचे रक्तस्त्राव थांबवण्यासाठी प्रेशर पॉइंट्सचा वापर कसा करावा, बँडेज कसे बांधावे, याचेही प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. जखमींची सुरक्षित हालचाल कशी करावी, त्यांना कमीत कमी वेदना होतील याची काळजी घेत हातपाय पकडून कसे उचलावे, हेही जवानांना शिकवण्यात आले. ॲम्ब्युलन्स येईपर्यंत कोणते उपचार करता येऊ शकतात, कोणती कृती तात्काळ जीव वाचवू शकते, आणि कोणत्या गोष्टी करायच्या नाहीत याबाबतही वैज्ञानिक दृष्टिकोनातून मार्गदर्शन केले गेले. या सर्व प्रशिक्षणामुळे अग्निशामक जवानांची आपत्कालीन परिस्थितीत प्रतिसाद देण्याची क्षमता अधिक सक्षम होणार असून, भविष्यातील आपत्तीमध्ये नागरिकांचे प्राण वाचवण्यासाठी हे प्रशिक्षण मोलाचे ठरणार आहे.

**“ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशामक दलाने नागरिकांच्या सुरक्षेसाठी आपत्ती व्यवस्थापनातील कौशल्य आत्मसात करणे ही काळाची गरज आहे. हे प्रशिक्षण जवानांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणारे आहे. वाहत्या पाण्यात बचावकार्य, प्राथमिक उपचार आणि आपत्कालीन प्रतिसाद यामधील त्यांची क्षमता निश्चितच वाढली असून, भविष्यातील कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमध्ये ते अधिक कार्यक्षमतेने नागरिकांची सेवा करतील, असा मला विश्वास आहे.**
**– प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

**“ पूरस्थितीत केवळ शारीरिक ताकद पुरेशी नसते, तर त्वरित निर्णय घेण्याची तयारी असणेही गरजेचे आहे. या प्रशिक्षणामुळे आम्हाला अशा वेळी कसे शांत राहायचे, योग्य तंत्र वापरून नागरिकांना सुरक्षितपणे कसे वाचवायचे, हे शिकायला मिळाले. आता अशा परिस्थितीला आम्ही अधिक आत्मविश्वासाने सामोरे जाऊ शकतो.**
**– पूजा वालगुडे, अग्निशामक जवान, अग्निशामक विभाग**

**“ कोलाड येथील प्रशिक्षण आमच्यासाठी प्रत्यक्ष परिस्थितीचा अनुभव देणारे ठरले. वाहत्या पाण्यातून बचाव, प्राथमिक उपचार आणि रुग्णाला योग्य पद्धतीने हलवणे याविषयी सखोल मार्गदर्शन मिळाले. हे प्रशिक्षण आमच्या कार्यक्षमतेत मोठी वाढ करून भविष्यातील आपत्ती हाताळण्यात नक्कीच मदत करेल.**
**– विजय घुले, उप अग्निशमन अधिकारी, अग्निशामक विभाग**

# बिबट प्रवण भागातील हिवरे पंचक्रोशीतील शेतीपंपाना आता दिवसा वीजपुरवठा

## तेजेवाडी येथील ४ मेगावॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पाचा महावितरणचे संचालक राजेंद्र पवार यांच्या हस्ते शुभारंभ





**पुणे । प्रतिनिधी**

'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' अंतर्गत तेजेवाडी येथील १२ एकर गायरानावर उभारलेल्या ४ मेगावॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पाचा बुधवारी (दि.३) महावितरणचे संचालक (मानव संसाधन) यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. त्यामुळे जुन्नर तालुक्यातील बिबट प्रवण क्षेत्रातील हिवरे बु. सह पंचक्रोशीमधील दहा गावांतील शेतीपंपाना आता दिवसा वीज पुरवठा सुरु झाला असून, येथील शेतकऱ्यांना पिकांना पाणी देण्यासाठी यापुढे रात्री-अपरात्री शेतीमध्ये जाण्याची गरज भासणार नाही.

राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' हाती घेतली आहे. या योजनेतून राज्यात १६ हजार मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प राज्यात होत असून, त्यातून तयार झालेली वीज शेतकऱ्यांना दिवसा दिली जात आहे. या योजनेतूनच जुन्नर तालुक्यातील हिवरे बु. ३३/११ केव्ही वीज उपकेंद्रांतर्गत ५ किमी परिघातील तेजेवाडी येथे १२ एकर गायरान जमिनीवर ४ मेगावॅट क्षमतेचा सौर प्रकल्प उभारण्यात आला आहे. या सौर प्रकल्पात तयार झालेली वीज हिवरे बु. उपकेंद्राला जोडून त्यांतर्गत येणाऱ्या १० गावांना आता दिवसा विजेचा लाभ मिळणार आहे. बुधवारी (दि. ३) महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांच्या हस्ते या प्रकल्पाचा शुभारंभ झाला. यावेळी महावितरणचे मुख्य अभियंता सुनिल काकडे अधीक्षक अभियंते युवराज जरग, अनिल घोगरे व संजीव नेहते, कार्यकारी अभियंते राहूल गवारे, केशव काळुमाळी, धनंजय अहेर व प्रवीण पंचमुख, तेजेवाडीचे सरपंच संपत सखाराम नायकोडी व उपसरपंच राजू विश्वासराव यांचेसह महावितरणचे अधिकारी, कर्मचारी तसेच मे. आवाडा कंपनीचे कर्मचारी उपस्थित होते.

**या गावांना होणार फायदा**

या सौर प्रकल्पामुळे बिबट प्रवण क्षेत्र असलेल्या जुन्नर तालुक्यातील तेजेवाडी, ओझर, हिवरे बु., हिवरे खु., शिरोली खु.,शिरोली बु., कुरण, ढोळवाडी, भोरवाडी आदी १० गावांतील २ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळणार आहे.

**शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी महावितरण कटिबद्ध– राजेंद्र पवार**

तेजेवाडी हा मंचर विभागातील तिसरा सौर प्रकल्प आहे. यापूर्वी पेठ (ता. आंबेगाव) व नेतवड (ता. जुन्नर) येथे अनुक्रमे ४ व ८ मेगावॅटचे प्रकल्प पूर्ण करुन तेथील स्थानिक शेतकऱ्यांना महावितरणने कायमस्वरुपी दिवसा वीज उपलब्ध करुन दिली आहे. ह्या भागात बिबट्यासह अनेक जंगली श्वापदे आहेत. पूर्वी रात्री-अपरात्री मिळणाऱ्या विजेमुळे शेतकऱ्यांना रात्री शेतात जाताना अनेक संकटांना सामोरे जावे लागत होते. मात्र आता सौर वाहिनी योजनेतील प्रकल्प पूर्ण झाल्याने या भागात शेतीला दिवसा वीज मिळणार असून, शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी महावितरण कटिबद्ध असल्याचे संचालक राजेंद्र पवार यांनी सांगितले.

## महिलांच्या सशक्तीकरणासाठी पिंक (गुलाबी) ई-रिक्षा खरेदी योजना

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील महिला व मुलींना रोजगार निर्मितीस चालना देणे त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, स्वावलंबी, आत्मनिर्भर करणे, सशक्तीकरणास चालना देण्यासाठी तसेच महिला व मुली यांना सुरक्षित प्रवास करणे यासाठी शहरात इच्छुक महिलांना पिंक रिक्षा खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य व रिक्षा चालविण्यासाठी इतर सोई सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील गरजु महिलांना रोजगारासाठी पिंक (गुलाबी) ई- रिक्षा योजना सुरू करण्यात आलेली आहे.

पिंक ई रिक्षा या योजनेमुळे महिलांना रोजगार निर्मितीस चालना मिळण्यासोबतच त्या स्वावलंबी, आत्मनिर्भर होण्यास मदत होणार आहे. विधवा, कायद्याने घटस्फोटित, राज्यगृहातील इच्छुक प्रवेशित, अनाथ युवती, अनुरक्षणगृह, बालगृहातील आजी, माजी प्रवेशित तसेच दारिद्र्य रेषेखालील महिलांना लाभाकरीता प्राधान्य देण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत पात्र ठरणाऱ्या महिलांना बँकेकडून ई-रिक्षा किंमतीच्या ७० टक्के कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे. राज्यशासन २० टक्के आर्थिक भार उचलणार असून लाभार्थी महिलांवर १० टक्के आर्थिक भार असणार आहे.

## महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांना 'एनर्जी लीडरशिप ॲवॉर्ड'

**मुंबई । प्रतिनिधी**

महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांना इंग्लंडच्या 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स'तर्फे ऊर्जा क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल नुकताच 'एनर्जी लीडरशिप ॲवॉर्ड २०२५' प्रदान करण्यात आला.

मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात परिवर्तन चालू असून त्यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या कामामुळे हा सन्मान झाला आहे. महावितरणच्या कामगिरीत राज्याच्या ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर व अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. या पुरस्काराचे श्रेय महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना आहे, असे मा. लोकेश चंद्र यांनी सांगितले.



वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्सचे प्रमुख पाब्लो स्टॅन्ले व अध्यक्ष हेन्री आर. यांच्या स्वाक्षरीने मा. लोकेश चंद्र यांना पुरस्कारस्वरूप प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स' ही इंग्लंडमधील जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त संस्था आहे. प्रशस्तीपत्रात म्हटले आहे की, ऊर्जा क्षेत्रातील असामान्य नेतृत्व, प्रशासनातील दूरदृष्टी आणि महाराष्ट्राच्या वीजवितरण क्षेत्रातील असामान्य योगदानाबद्दल मा. लोकेश चंद्र यांना एनर्जी लीडरशीप ॲवॉर्ड २०२५ प्रदान करण्यात येत आहे. कार्यक्षमता, कल्पकता आणि सेवेबद्दलच्या समर्पित वृत्तीमुळे मा. लोकेश चंद्र यांनी अक्षय्य ऊर्जेच्या वापराला चालना देण्यासोबतच लाखो नागरिकांना भरवाशाचा वीज पुरवठा करण्यात प्रमुख भूमिका बजावली आहे. अक्षय्य ऊर्जेचा वापर करून वीजखरेदी खर्चात मोठी बचत करून वीजदरात कपात करण्याची ऐतिहासिक कामगिरी महावितरणने केली आहे. अशा प्रकारे वीजदरात कपात करणारी महावितरण ही देशातील पहिलीच सार्वजनिक वीज वितरण कंपनी आहे. पुढील पाच वर्षात वीज खरेदीमध्ये अक्षय्य ऊर्जेवर भर दिल्यामुळे महावितरणची सुमारे ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याने पाच वर्षे वीजदरात कपात शक्य झाली आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठीच्या जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाच्या अंमलबजावणीत मा. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. राज्यात ठिकठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारून त्यावर ४५ लाख कृषी पंप चालविण्याची ही १६,००० मेगावॅट क्षमतेची गेम चेंजर योजना आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळवून देणाऱ्या छतावरील सौर ऊर्जा निर्मिती योजनेमध्ये राज्यातील ग्राहकांनी नुकताच एक हजार मेगावॅटचा टप्पा ओलांडला.

## गडचिरोलीतील नागरिकांना आता 'स्पेक्स २०३०' उपक्रमाद्वारे नेत्रसेवा : मुख्यमंत्री फडणवीस

### सार्वजनिक आरोग्य विभाग आणि जागतिक आरोग्य संघटनेचा उपक्रम

**मुंबई । प्रतिनिधी**

गडचिरोलीसारख्या आदिवासी व मागास जिल्ह्यां मध्ये डोळ्यांच्या आरोग्याविषयी जनजागृती व उपचार पोहोचविण्यासाठी तसेच तेथील नागरिकांना परवडणाऱ्या व गुणवत्तापूर्ण नेत्रसेवा उपलब्ध करुन देण्यावर भर देण्यात येत आहे.

राज्याचा सार्वजनिक आरोग्य विभाग आणि जागतिक आरोग्य संघटना यांच्या स्पेक्स २०३० या प्रकल्पामुळे मुलांचे शिक्षण, तरुणांसाठी रोजगार व संपूर्ण समाजाच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जागतिक आरोग्य संघटनेमार्फत राबविण्यात येणारा हा उपक्रम महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यात राबविण्यात यावा, असे आवाहन केले. जागतिक आरोग्य संघटनेमार्फत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमा मुळे गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुका आता डोळ्यांसंदर्भातील आरोग्यसेवेच्या दृष्टीने देशभरात आदर्श ठरणार आहे. जागतिक आरोग्य संघटनेचा 'स्पेक्स २०३०- वन साईट कार्यक्रम राज्य सरकारच्या आरोग्य विभाग आणि वन साईट एसीलॉर लक्सोटिका फाऊंडेशन यांच्या सहकार्याने गडचिरोलीसह देशातील पाच मागास जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणार आहे.

हा उपक्रम राष्ट्रीय अंधत्व निवारण व दृष्टिदोष नियंत्रण कार्यक्रम (NPCBVI) अंतर्गत राबविला जाणार आहे. जगभरात २.२ अब्ज लोकांना दृष्टीदोषाचा त्रास असून, त्यातील किमान १ अब्ज प्रकरणे टाळता येऊ शकतात. भारतात जवळपास ५३ टक्के दृष्टीदोष हे अपूर्ण दृष्टीदोष दुरुस्तीमुळे (Refractive Errors) निर्माण होतात. यामध्ये प्रत्येक दहा शाळकरी मुलांपैकी एका मुलाला दृष्टीविषयक समस्या भेडसावते. या पार्श्वभूमीवर जागतिक आरोग्य संघटनेमार्फत स्पेक्स २०३० ही योजना सुरू करण्यात आली असून २०३० पर्यंत सर्वसामान्यांना स्वस्त व दर्जेदार चष्म्यांचा पुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जागतिक आरोग्य संघटनेमार्फत गडचिरोलीसह आसाम (धुब्री), ओडिशा (कलाहांडी), राजस्थान (अलवर) आणि उत्तर प्रदेश (प्रयागराज) या राज्यांतील निवडक भागांमध्ये आशा किरण मॉडेलच्या आधारे सेवा राबवली जाणार आहे.

## शासकीय वसतीगृहाकरिता इमारत भाडेतत्वावर मिळणेबाबत आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त राज्यात मागासवर्गीय मुलींसाठी नवीन ५० शासकीय वसतिगृह मंजूर करण्यात आलेली आहेत. यामध्ये विभागीय स्तरावर २५० विद्यार्थी क्षमतेची पुणे शहरामध्ये पुणे कॅन्टोमेंट व कोथरुड पुणे याठिकाणी प्रत्येकी एक याप्रमाणे दोन वसतिगृहे मंजूर करण्यात आलेली आहे.

पुणे कॅन्टोमेंट आणि कोथरुड पुणे या परिसरामध्ये २५० विद्यार्थिनी क्षमतेचे वसतिगृह सुरु करावयाचे असल्याने सर्व सोयींनीयुक्त खाजगी इमारत भाडयाने घ्यावयाची आहे. ही इमारत २० ते २५ हजार चौरस फूट क्षेत्रफळाची असणे आवश्यक असून त्यामध्ये २५० विद्यार्थिनींची निवासाची सोय असणे आवश्यक आहे. तसेच त्या इमारतीमध्ये किमान २५ ते ३० खोल्या, पुरेसे संडास व बाथरुम, लाईट, पिण्याचे पाणी, पाणी साठवणूकीसाठी टाकी, तसेच इमारती भोवती संरक्षक भिंत असणे आवश्यक आहे. इमारत भाड्याने देण्याकरिता इच्छुकांनी परीपूर्ण कागदपत्रांच्या छांयाकित प्रतीसह तात्काळ पुण्याचे सहायक आयुक्त, समाज कल्याण, पुणे (भ्रमणध्वनी क्र. ९७६४८३२०२३) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन प्रसिद्धीपत्रकान्वये केले आहे.

## रेल्वे प्रवाशांचे मोबाईल चोरी करणारे दोन आरोपी पोलीसांच्या ताब्यात

**पुणे । प्रतिनिधी**

मंगळवार पेठ येथे पदपथावर झोपडी टाकून राहणाऱ्या दोनजण पुणे रेल्वे स्टेशन मध्ये प्रवाशांचे मोबाईल चोरत असत. संशयिताना पुणे लोहमार्ग पोलीसांनी शिताफीने पकडले. बुध्दराज मोरपाल बागडी ( वय ३२ वर्षे) व अमरलाल हंसराज बागडी ( वय २२ वर्षे दोघे रा. रा. मु.पो. डिलोदा, ता. बारा, जि. बारा. राज्य राजस्थान, सध्या राह. मंगळवार पेठ) असे या आरोपींची नावे आहेत.





या बाबतची हकीकत अशी, फिर्यादी नामे रूतुराज दिलीपराव काटकर (वय २६ वर्षे, रा.जगदंबा सोसायटी, वडगाव शेरी) व नामे संजय मडीया डिन्डोड हे सोमवार (ता. २९) हे पुणे रेल्वे स्थानकात आले होते. ते नऊ च्या च्या सुमारास पुणे रेल्वे स्टेशन प्लॅटफॉर्म नं. १ वर उभ्या दानापुर एक्स. गाडीच्या इंजिनकडील बाजुच्या जनरल डब्यात चढत होते. त्यावेळी त्यांचा १५,०००/- रू. किंमतीचा एक विवो कंपनीचा मोबाईल फोन कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेला. याबाबत त्यांनी पुणे लोहमार्ग पोलीस ठाणेत फिर्याद दाखल केली होती. होता. नमुद दाखल गुन्हयाचा तपासा करताना बातमीदार मार्फत खात्रीलायक माहिती मिळाली की, काही संशयित हे मंगळवार पेठ सिग्नल चौकात झोपडी टाकुन राहतात . तेथे पुण्यातील नागरीकांचे मोबईल चोरतात . त्यावरून पुणे लोहमार्ग पोलीस ठाणेकडील सर्वेलन्स पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार व आरपीएफ पुणे युनिट यांनी संयुक्तीक रित्या मंगळवार पेठ सिग्नल चौकात जावुन छापा मारला. त्यावेळी संशयित बुध्दराज बागडी व अमरलाल बागडी हे पोलीसांना पाहुन पळु लागले. पोलीसांनी त्यांचा पाठलाग करून शिताफीने पकडले. झोपडीची झडती घेतली असता नमुद गुन्हयातील गेले विवो

कंपनीचा मोबाईल व इतर वेगवेगळ्या कंपनीचे १९ मोबाईल फोन असे एकुण एक लाख ९० हजार चारशे रू. किंमतीचे २० मोबाईल फोन जप्त केले. त्यांचेकडे मिळुन आलेल्या सदर मोबाईल बाबत पोलीसी खाक्या दाखवुन चौकशी करता, आरोपी हे जुन्या बाजारातुन कोणत्याही प्रकारची खात्री न करता मोबाईल विकत घेतात व कोणत्याही ग्राहकास क्षुल्लक किंमतीत विकतात असे निष्पन्न झाले आहे. संशयीत दोनजणांना शिताफीने पकडून त्यांना ताब्यात घेतले असुन त्यांनी सदरचे मोबाईल फोन चोरी केल्याचे कबुल केले.

ही कारवाई ही पुणे लोहमार्ग पोलीस अधीक्षक अश्विनी सानप, अपर पोलीस अधीक्षक रोहीदास पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी जयराम पायगुडे यांचे मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक . प्रमोद खोपीकर, पोलीस उपनिरीक्षक यशवंत साळुंके, सपोफौ. सुनिल कदम, सपोफौ अनिल दांगट, पो.हवा. निलेश बिडकर, पो.शि. सिध्दार्थ वाघमारे, पो.शि. नेमाजी केंद्रे व म.पो.शि. मारटकर, मपोहवा छाया चव्हाण, शखे तसेच आरपीएफ पुणे कडील निरीक्षक यादव, उपनिरीक्षक लाड, आरक्षक युवराज गायकवाड, विशाल माने, रसुल सय्यद यांनी केली आहे.